# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 08 October 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०८ ऑक्टोबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- हरियाणात भाजपला तिसऱ्यांदा सत्तास्थापनेचा कौल तर जम्मू काश्मीरमध्ये नॅशनल कौन्फ्रन्स आणि काँग्रेस आघाडीला स्पष्ट बहुमत.
- ७० वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्रदान–ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांचा दादासाहेब फाळके पुरस्कार देऊन गौरव.
- राज्यात सर्वच उपसा सिंचन योजनांच्या सौरऊर्जीकरणासाठी २९ हजार कोटी रुपये निधी प्राप्त.

आणि

- नागरिकांना पारदर्शक आणि गतिमान सेवा देण्याचे राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे आयुक्त डॉ. किरण जाधव यांचे निर्देश.

****

हरियाणा आणि जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीचं चित्र जवळपास स्पष्ट झालं आहे. हरियाणात भाजपला तिसऱ्यांदा जनतेनं सत्तास्थापनेचा कौल दिला असून, जम्मू काश्मीरमध्ये नॅशनल कौन्फ्रन्स आणि काँग्रेस आघाडीला स्पष्ट बहुमत मिळालं आहे. सायंकाळ साडे पाच वाजेपर्यंत हाती आलेल्या निकालानुसार हरियाणा विधानसभेच्या ९० जागांपैकी भाजपने ४१ जागांवर विजय मिळवला असून, सात जागांवर भाजपचे उमेदवार आघाडीवर आहेत. काँग्रेसने ३३ जागांवर विजय मिळवला असून, आणखी चार जागांवर काँग्रेस उमेदवार आघाडीवर आहेत. तीन जागांवर अपक्ष उमेदवार विजयी झाले आहेत.

जम्मू काश्मीर विधानसभेच्या ९० जागांपैकी नॅशनल कौन्फ्रन्सने ४२ जागा तर त्यांचा मित्र पक्ष असलेल्या काँग्रेसने सहा जागा जिंकल्या आहे. भारतीय जनता

पक्षाने २९ जागांवर विजय मिळवला आहे. मेहबुबा मुफ्ती यांच्या पीपल्स डेमोक्रेटिक पार्टीला मात्र जनतेने नाकारलं आहे. त्यांना अवघ्या तीन जागा जिंकता आल्या. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष तसंच आम आदमी पक्षाला प्रत्येकी एक जागा मिळाली असून, सात जागांवर अपक्ष उमेदवार निवडून आले आहेत.

****

७० वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आज प्रदान करण्यात आले. नवी दिल्लीत विज्ञान भवनात झालेल्या कार्यक्रमात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना चित्रपट सृष्टीतल्या योगदानासाठीचा दादासाहेब फाळके पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. याशिवाय, दीपक दुआ यांना उत्कृष्ट चित्रपट समीक्षेसाठी सुवर्ण कमळ देऊन गौरवण्यात आलं. चित्रपट विषयावरील सर्वोत्कृष्ट पुस्तकासाठीचं सुवर्णकमळ अनिरुद्ध भट्टाचार्य यांना 'किशोर कुमार–द अल्टीमेट बायोग्राफी' या पुस्तकासाठी प्रदान करण्यात आलं. गुलमोहर या हिंदी चित्रपटातल्या भूमिकेसाठी मनोज वाजपेयी यांना गौरवण्यात आलं तर पोन्नियन सेल्वम या चित्रपटासाठी दिग्दर्शक मणीरत्नम यांचा तर याच चित्रपटातल्या पार्श्वसंगीतासाठी संगीतकार ए आर रेहमान यांचा गौरव करण्यात आला. उंचाई चित्रपटाच्या दिग्दर्शनासाठी सुरज बडजात्या यांना तर याच चित्रपटातल्या भूमिकेसाठी नीना गुप्ता यांना सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेत्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. कांतारा चित्रपटातल्या भूमिकेसाठी ऋषभ शेट्टी यांना, पदार्पणातल्या दिग्दर्शनासाठी प्रमोद पुन्हाना यांना तर मल्याळी दिग्दर्शक आनंद एकर्षी यांच्या आटम या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठीचं सुवर्णकमळ प्रदान करण्यात आलं. याच चित्रपटाला सर्वोत्कृष्ट संहितेचं रौप्यकमळ देऊनही गौरवण्यात आलं.

मुर्मूर्स ऑफ जंगल या मराठी माहितीपटासाठी सोहील वैद्य यांना तसंच सचिन सूर्यवंशी यांच्या वारसा या चित्रपटाला राष्ट्रपतींच्या हस्ते रौप्यकमळ प्रदान करण्यात आलं.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वाशिम इथल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचं उद्या बुधवारी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून उद्घाटन होणार आहे. या कार्यक्रमाला राज्यपाल सीपी राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार उपस्थित राहणार आहेत.

****

नांदेडमध्ये परवा दहा ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत महिला सक्षमीकरण मेळावा होणार आहे. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करणवाल यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती मैदानावर भेट देऊन या कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा घेतला.

****

राज्यातील सर्वच उपसा सिंचन योजनांसाठी आता सौरऊर्जीकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी केंद्र शासनाने राज्यशासनाला जवळपास २९ हजार कोटी रुपये निधी दिला असल्याचं, उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे. ते आज सोलापूर इथं मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेच्या वचनपूर्ती सोहळ्यात बोलत होते. ज्या गावात अद्यापही वीज पोहोचलेली नाही त्या ठिकाणी वीज पुरवठा करण्यासाठी या योजनेचा उपयोग होणार आहे. सध्या या योजनेच्या पहिल्या टप्प्यात १२ हजार कोटी तर दुसऱ्या टप्प्यात ३ हजार कोटी रुपयांची कामं सुरु असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार या कार्यक्रमाला उपस्थित होते. लाडकी बहीण योजनेसह कोणतीही योजना बंद होणार नाही, यासंदर्भात विरोधकांच्या खोट्या प्रचाराला बळी पडू नका, असं आवाहन दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी केलं. ते म्हणाले...

**या योजना बंद करा अशा प्रकारची या सावत्र भावांनी याचिका दाखल केली आहे. पण मी तुम्हाला सांगतो,तुमचे सख्खे भाऊ मुंबईमध्ये बसले आहेत.काहीही झालं तरी आम्ही या योजना बंद होऊ देणार नाही.**

**एक तर घोषणा देताना दहादा विचार करु, परंतू विचार पूर्वक योजना दिल्यावर मागे हटणार नाही. उद्याच्याला विरोधक येऊन काहीही खोटं नाटं रेटून सांगतील,कृपा करुन लोकसभेच्यासारखा विश्वास ठेवू नका.**

दरम्यान, अक्कलकोट इथल्या विविध विकासकामांचं भूमिपूजनही आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं.

****

तळागाळातल्या नागरिकापर्यंत आरोग्य सुविधा पुरवण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितलं. नागपूर इथं एम्स अर्थात अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमाला ते संबोधित करत होते. डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांना सुरक्षा पुरवणं याला सरकारची प्राथमिकता असल्याचं जाधव यांनी सांगितलं

****

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन हे उद्या बीड तसंच जालना दौऱ्यावर येत आहेत. छत्रपती संभाजीनगर इथून सकाळी दहा वाजताच्या सुमारास ते हेलिकॉप्टरने बीडकडे प्रयाण करतील. दुपारी दोन वाजेपर्यंत विविध क्षेत्रातल्या मान्यवरांशी संवाद साधून सव्वा दोन वाजताच्या सुमारास हेलिकॉप्टरने ते जालन्याकडे प्रयाण करणार आहेत.

****

छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेच्या वतीनं डिजिटल डोम थिएटर तारांगण उभारण्यात आलं आहे. आज या डिजिटल डोम थिएटर तारांगणाचा पहिला खेळ दाखवण्यात आला. तारांगणातल्या चौथ्या कक्षाचं मनपा आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्याहस्ते उद्घाटन करण्यात आलं.

****

तुळजापूर इथं श्री तुळजाभवानी देवीची आज सहाव्या माळेला मुरली अलंकार महापूजा बांधण्यात आली. उद्या शेषशायी अलंकार महापूजा बांधण्यात येणार आहे. पाचव्या माळेपासून श्री तुळजाभवानी देवीची विविध अलंकार रुपातील पूजा मांडण्यात येत आहे.

****

नागरिकांना लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान सेवा द्यावी, असे निर्देश राज्य लोकसेवा हक्क आयोगाचे आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी दिले. छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हाधिकारी कार्यालयात आज लोकसेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीचा जाधव यांनी आढावा घेतला त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना आदी मान्यवर अधिकारी, तहसीलदार, विभाग प्रमुख उपस्थित होते. सर्व विभागांनी ऑनलाईन सेवा देण्यास प्राधान्य द्यावे, तसंच ऑफलाईन सेवा, तात्काळ ऑनलाईन पद्धतीत रूपांतरित करून नागरिकांना उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही आयुक्त जाधव यांनी यावेळी केल्या.

****

छत्रपती संभाजीनगर इथं महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या महागामी संस्थेच्या वतीनं तस्मै श्री गुरवे नमः हे वार्षिक सादरीकरण नुकतंच करण्यात आलं. गुरु पार्वती दत्ता यांच्या शिष्यांनी कथक आणि ओडिसी रचनांचा एक अनोखा संग्रह

सादर केला. ज्ञानेश्वरीतल्या काही निवडक ओव्या “चंद्र तेथे चंद्रिका” या भक्ती रचनेने या सादरीकरणाचा समारोप झाला.

****

लातूर जिल्ह्यात विविध वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनी यांच्या आरोग्य विषयक तसंच इतर बाबतीत काही गैर घडल्यास संबंधित वसतीगृहाचे अधीक्षक, प्राचार्य तसंच संस्था चालकांवरही गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी दिला आहे. लातूर शहरातील पूरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन तसंच नवोदय विद्यालयात जेवणातून झालेल्या विषबाधेच्या नुकत्याच घडलेल्या घटनेनंतर जिल्हाधिकारी ठाकूर यांनी आज सर्व संबंधीत प्राचार्य, संस्थाचालक यांची बैठक घेतली, त्या बैठकीत त्यांनी हा इशारा देत, संबंधितांना खबरदारीच्या सूचना दिल्या.

****

पुण्याच्या क्रीडा विश्वात मानाची समजली जाणारी ३८ वी पुणे आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन स्पर्धा एक डिसेंबर रोजी होणार असून या स्पर्धेच्या नाव नोंदणीला सुरुवात झाली आहे. स्पर्धा प्रवेशाची अंतिम तारीख 15 नोव्हेंबर आहे. www.Marathon Pune.com या संकेतस्थळावरून प्रवेश अर्ज भरता येईल. ही स्पर्धा पूर्ण मॅरेथॉन, अर्ध मॅरेथॉन, दहा किलोमीटर, पाच किलोमीटर, तीन किलोमीटर आणि दिव्यांग दौड अशा विविध गटात होणार आहे.

****

महिलांच्या टी – ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताचा सामना उद्या श्रीलंकेविरुद्ध होणार आहे. दुबई इथं खेळला जाणारा हा सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी साडे सात वाजता सुरु होईल.

****